


पवनाथडी जत्रेच्या आयोजनासह विविध विषयक कामांना मंजुरी

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्षे 3रे

www.metrocityvrutant.in  बुधवार दिनांक 29/01/२०२५  METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 34 ‖ RNI - MAHMAR/2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# भारतीय संस्कृतीचे जतन करण्यासाठी लिपी जिवंत ठेवणे आवश्यक - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई, दि. 28 : अक्षरलिपी या सभ्यता व संस्कृतीच्या वाहक असतात. भारतीय संस्कृती प्राचीन असून संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या लिपीचे जतन करणे गरजेचे आहे.

अन्यथा आपला इतिहास विसरला जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.सुलेखनकार अच्युत पालव लिखित 'अक्षरभारती' या कॅलिग्राफी पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते जहांगीर आर्ट गॅलरी येथे झाले.

यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, नवनीत प्रकाशनाचे संचालक अनिल गाला, पद्मश्री अच्युत पालव उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पद्मश्री पालव अक्षर कलेला सर्वत्र पोहोचवत असून अनेक लोकांना या कलेमध्ये समाविष्ट करत आहेत. कोणत्याही व्यक्तीला एखाद्या विषयात चांगले गुण मिळवायचे असतील तर त्यांचे अक्षर चांगले असणे आवश्यक आहे.

एक मोठा ज्ञानाचा खजिना देखील या अक्षरांच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचत असतो, असे सांगून मुख्यमंत्र्यांनीपालव यांचे पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन केले.

# महापालिका निवडणुका पुन्हा लांबणीवर

## सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी पुढे ढकलली!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने आणि ओबीसी आरक्षणासहित निवडणुका व्हाव्यात की नाही आदी विविध विषयांवर सर्वोच्च न्यायालयात प्रश्न प्रलंबित असताना आजची सुनावणीही संपली आहे. आता या प्रकरणी २५ फेब्रुवारीला पुढची सुनावणी होणार असून यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडल्या आहेत. याप्रकरणी पालिकेचे वकिल देवदत्त यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली.

अॅड. देवदत्त म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत ओबीसी आरक्षणाच्या निर्णयाला आव्हान आलं आहे. या प्रकरणी सुनावणीला वेळ लागेल. ओबीसीच्या राजकारणातील आरक्षणाचा विषय पूर्णपणे क्लिअर झाला आहे. त्या विषयावर कोणत्याही पक्षात मतभेद नाहीत. सुरुवातीला कोर्टाने ५ फेब्रुवारी तारीख दिली होती. पण त्यादिवशी दिल्लीच्या निवडणुका आहेत, त्यामुळे २५ फेब्रुवारीला आता पुढील सुनावणी होणार आहे.

"आता २५ फेब्रुवारीला निर्णय आला आणि जैसे थे स्थिती उठवली तरच एप्रिल मेपर्यंत निवडणुका होऊ शकतील. पुढच्या सुनावणीवेळी हे प्रकरण लवकर ऐकण्यात येईल, असं आश्वासनही कोर्टाने दिलं असल्याचं अॅड. सिद्धार्थ शिंदे म्हणाले.




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 29/01/२०२५

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# पवनाथडी जत्रेच्या आयोजनासह विविध विषयक कामांना मंजुरी

## स्थायी समिती बैठक आयुक्तांच्या उपस्थितीत संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पवनाथडी जत्रा २०२४-२५ उपक्रमाचे आयोजन करणे, सन २०२५-२६ या सरकारी वर्षाकरिता करांचे व करेत्तर बाबींचे दर निश्चिती करणे अशा विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता दिली.स्थायी समिती आणि महापालिका सभेची मान्यता आवश्यक असलेले विषय प्रशासक शेखर सिंह यांच्या मान्यतेसाठी आज झालेल्या बैठकीत ठेवण्यात आले होते. पिंपरी येथील महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत पार पडलेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.समाजविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महापालिका हद्दीतील महिला बचत गट आणि बचत गटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तू उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांना मार्केटिंग कौशल्ये ज्ञात व्हावीत, महिला उद्योजिका तयार व्हाव्यात या हेतूने दरवर्षी पवनाथडी जत्रा या उपक्रमाचे आयोजन केले जाते. यावर्षी देखील सांगवी येथील पी.डब्लू. डी. मैदान येथे २१ ते २४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.महापालिकेच्या कर



आकारणी व कर संकलन विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२७ व १२९ मधील तरतुदीनुसार शहरातील इमारत तसेच जमिनीवर मालमत्ता कर आकारणीची तरतूद आहे. आकारणी रजिस्टरला नोंद असलेल्या मालमत्तांवर कलम ९९ मधील तरतूदीनुसार महापालिका सभेने मंजूर केलेल्या दराने मालमत्ता कराची आकारणी केली जाते. तसेच शासनाचे शिक्षणकर, रोजगार हमी कर व फ्लोअरेज कराची वसुली राज्य शासनाने ठरवून दिलेल्या दराने महाराष्ट्र शासनाकरिता केली जाते. त्यानुसार सन २०२५-२६ करिता कर व करेत्तर बाबींचे प्रस्तावित दर प्रशासक यांच्या मान्यतेसाठी स्थायी समिती सभेत सादर करण्यात आले. या दरांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज मान्यता दिली.

# बापू दिनकर कातळे व संकल्प सोशल फाउंडेशनचा अभिनव उपक्रम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरात प्रजासत्ताक दिन 26 जानेवारी निमित्त बापू दिनकर कातळे व संकल्प सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दुर्ग बांधणी स्पर्धा 2024 पर्व चे बक्षीस वितरण समारंभ पार पडले . यावेळी प्रथम विकास नगर, किवळे भागातील जेष्ठ नागरिक सदस्य व माजी सैनिक शशिकांत तावडे, यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले.दुर्ग बांधणी स्पर्धा मधील विजेत्यांना सामाजिक कार्यकर्ते रवींद्र कदम व हंबीरराव आवटे ,दिनकरराव कातळे ,गौतम अण्णा गायकवाड प्रकाश



कातळे,अशोक कातळे ,अजित देशमुख ,सुधीर तरस, अविनाश कातळे,मंगेश सावंत, काळे काका ,,विष्णू इंगळे, ,बाळासाहेब घोलप, सुरेश पाटील, अनिल पवार, बाबासाहेब तरकसे, चंद्रकांत चौधरी, राजकुमार सोनवणे, गणपत गोळे,महेंद्र दळवी, सुरेश वैरागर ,रामा शिवणकर प्रकाश सकट सुजित चंद्रन या मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ करण्यात आला.या मध्ये मोठा गट ,प्रथम पारितोषिक - निर्वाना बियॉन्ड सोसायटी, किवळे द्वितीय पारितोषिक - मायटी युथ क्लब ,मामुर्डीगाव , तृतीय पारितोषिक - शिवसाम्राज्य प्रतिष्ठान,किवळे,उत्तेजनार्थ व गौरवचिन्ह ,शिवशंभो ग्रुप साईनगर नवरंग सोसायटी,लहान गट - प्रथम पारितोषिक - तन्मय बाळकृष्ण कातळे, द्वितीय पारितोषिक - प्रद्युम्न दत्तात्रय कुलकर्णी , तृतीय पारितोषिक- अथर्व गणेश जरे ,उत्तेजनार्थ व गौरव चिन्ह वरद विकास कातळे सर्वांचे बापू दिनकर कातळे यांनी आभार व्यक्त केले.

## सदनिकेचे कुलूप तोडून साडेसात लाखांचा ऐवज चोरीला

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी रोकड, सोन्याचे दागिने असा सात लाख ६५ हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना कोंढव्यातील हेवन पार्क सोसायटीत घडली. याबाबत एकाने कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार कोंढव्यातील हेवन पार्क सोसायटीत राहायला आहेत. २४ जानेवारी रोजी तक्रारदार आणि कुटुंबीय बाहेरगावी गेले होते. शनिवारी रात्री (२५ जानेवारी) रात्री अकराच्या सुमारास ते घरी परतले. तेव्हा सदनिकेच्या दरवाज्याचे कुलूप तुटल्याचे लक्षात आले. चोरट्यांनी शयनगृहातील कपाट उचकटून रोकड, सोन्याचे दागिने असा सात लाख ६५ हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याचे उघडकीस आले. पोलीस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे तपास करत आहेत.

# मोफत कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : एस. एन. बी. पी. विधी महाविद्यालय मोरवाडी पिंपरी आणि पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व खेड राजगुरूनगर तालुका विधी सेवा समिती तसेच राजगुरूनगर बार असोसिएशन खेड, पुणे आणि स्व. प्रा. नानासाहेब गोरडे सार्वजनिक ग्रंथालय, गोसासी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय मोफत कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर शनिवार, दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी गोसासी, तालुका राजगुरुनगर खेड, जिल्हा पुणे येथे संपन्न झाले. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश राजगुरुनगर पुणेचे ए. एस. सय्यद कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. गट विकास अधिकारी विशाल शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते; तसेच न्यायाधीश एस. पी. पोळ, पी. एस. इंगळे,



ए. एम. हुसेन, सरिता विश्वभरण, एस. बी. नाईकनवरे (गरड), जे. व्ही. मस्के, राजगुरुनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. रोहिदास टाळकर, स्व. नानासाहेब गोरडे सार्वजनिक ग्रंथालय गोसासीचे अध्यक्ष ॲड. सतिश गोरडे, एस. एन. बी. पी. विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रोहिणी जगताप, प्रा. कैलास पोळ, एस. एन.बी. पी. विधी महाविद्यालय विधी कक्ष साहाय्यक अधिकारी स्वप्निल जाधव, सरपंच संतोष गोरडे, ग्रामसेवक अजित पलांडे, तंटामुक्त अध्यक्ष मारुती गोरडे, प्रिया तोतले, अर्पिता गोस्वामी, सुनीता तपासे, गजानन वडूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबिरात महिला सक्षमीकरण आणि कायदेशीर हक्क, बालकाचे हक्क आणि बालसंरक्षण कायदे, सायबर गुन्हे आणि त्यावरील उपाय, जमिनीचे हक्क आणि जमिनीवरील वाद, अपघात आणि नुकसान भरपाईसाठी कायदेशीर प्रकिया, मोफत विधी साहाय्य याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. स्वप्निल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घरेलू अत्याचार यावर आधारित पथनाटिका सादर केली.

कार्यक्रमाच्या संयोजनात ॲड. सोहम यादव, ॲड. आशिष गोरडे, ॲड. सुशांत गोरडे, ॲड. ऋतुराज आल्हाट, ॲड. अथर्व गोरडे, गोविंदनाना गोरडे, आप्पासाहेब गोरडे, लक्ष्मण गोरडे, बाळासाहेब गोरडे, माउली गोरडे, नवनाथ घोलप, अश्विनी गोरडे, संतोष अरुडे, उत्तम गोरडे, सुधाकर गोरडे यांनी परिश्रम घेतले. सर्व ग्रामवासीयांचा शिबिराला भरभरून प्रतिसाद मिळाला.

# एनआयपीएम मुळे व्यावहारिक ज्ञान, कौशल्यात सुधारणा

## पीसीयूमध्ये एनआयपीएम ची शाखा सुरू

## - कल्याण पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे (दि. २८ जानेवारी २०२५) : नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सनल मॅनेजमेंटची (एनआयपीएम) पिंपरी चिंचवड विद्यापीठातील शाखा मानव संसाधन व अन्य व्यवस्थापन क्षेत्रात करिअर करण्यास इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध करून देईल. विद्यार्थ्यांना उद्योगातील प्रमुख मानव संसाधन अधिकारी यांच्याशी व्यावसायिक संपर्क वाढविण्यास मार्गदर्शन व मदत करेल. या उद्योग प्रेरित उपक्रमांद्वारे प्रत्यक्ष अनुभव मिळतील व व्यावहारिक ज्ञान, कौशल्यात सुधारणा होतील. ज्यामुळे त्यांची रोजगार क्षमता वाढेल व स्पर्धात्मक जगात आणखी पुढे जाण्यास मदत होईल असे प्रतिपादन पीसीयु मधील एनआयपीएम चे अध्यक्ष कल्याण पवार यांनी केले.



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठामध्ये नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सनल मॅनेजमेंट (एनआयपीएम) च्या शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या शाखेमुळे बीबीए व एमबीएच्या विद्यार्थ्यांना करिअर साठी व्यावसायिक नेटवर्किंग, उद्योगातील अनुभव आणि प्रगतीसाठी अभूतपूर्व संधी मिळतील.

उद्घाटन प्रसंगी पीसीयूच्या कुलगुरू, डॉ. मनीमाला पुरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, कल्याण पवार (अध्यक्ष), डॉ. कीर्ती धारवाडकर (उपाध्यक्ष), ॲड. प्रशांत क्षीरसागर (अतिरिक्त सचिव), सतीश पवार, किशोर केंचे, पवन शर्मा व वहीदा पठाण (कार्यकारी समिती सदस्य), स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे प्रमुख, डॉ. अमित पाटील, समन्वयक डॉ. दीप्ती शर्मा व डॉ. सोनम सिंग आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मनीमाला पुरी प्रास्ताविक करताना सांगितले की, अशा उपक्रमांतून करिअरसाठी व्यावसायिक नेटवर्किंग वाढवता येईल.

प्र-कुलगुरू, डॉ. सुदीप थेपडे म्हणाले की, स्पर्धात्मक बाजारात पुढे जाण्यासाठी एनआयपीएम मार्गदर्शकाची भूमिका करेल.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कर्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 29/01/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 'जिव्हाळा' हे मित्रत्वाचे प्रतीक ! - राजन लाखे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

"जिव्हाळा' हे मित्रत्वाचे प्रतीक आहे!' असे गौरवोद्गार महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी - चिंचवड शाखाध्यक्ष राजन लाखे यांनी विरंगुळा केंद्र, पागेच्या तालमीसमोर, चिंचवडगाव येथे सोमवार, दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी काढले. ज्येष्ठ नागरिक संघ, चिंचवड या संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त प्रकाशित करण्यात आलेल्या 'जिव्हाळा' या वार्षिक अंकाचे प्रकाशन करताना राजन लाखे बोलत होते. राष्ट्रपती पारितोषिक प्राप्त पिंपरी - चिंचवड महापालिका अग्निशमन अधिकारी किरण गावडे, लायन्स क्लब ऑफ आकुर्डीचे अध्यक्ष बाबूराव सागावकर, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रमेश इनामदार, उपाध्यक्ष चंद्रकांत कोष्टी यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.




राजन लाखे पुढे म्हणाले की, 'आयुष्याला वय असते; पण वयाला आयुष्य नसते. अध्यात्माकडील वाटचालीत हा 'जिव्हाळा' आनंद प्रदान करणारा आहे; कारण वैयक्तिक, कौटुंबिक अन् सामाजिक परीघ व्यापून तो माणसाला माणूस जोडण्याचे काम करतो आहे!' किरण गावडे यांनी, 'प्रत्येक व्यक्तीने आयुष्याच्या वळणावर आपली कौटुंबिक जबाबदारी पार पाडून सामाजिक कार्यात खारीचा वाटा उचलावा!' अशी अपेक्षा व्यक्त केली; तर बाबूराव सागावकर यांनी, 'ज्येष्ठांच्या अनुभवाचा लाभ सर्व क्षेत्रांत होऊ शकतो असा माझा स्वानुभव आहे!' असे मत मांडले. अध्यक्ष रमेश इनामदार यांनी प्रास्ताविकातून संघाच्या उपक्रमांबाबत माहिती देऊन सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन आणि त्रिवार ओंकार करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. शंखनाद, टाळ्यांच्या साथ आणि फुलांची उधळण करीत सजवलेल्या पालखीतून 'जिव्हाळा' अंकाच्या प्रती अपूर्व उत्साहात व्यासपीठावर प्रकाशनासाठी आणण्यात आल्या. "जिव्हाळा' हा अंत:करणातील उमाळा आहे!' अशा भावोत्कट शब्दांतून संपादक नंदकुमार मुरडे यांनी या वार्षिकांकाचे अंतरंग उलगडून सांगितले. लायन वसंत गुजर यांच्या प्रयत्नांतून आणि लायन्स क्लब पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संघासाठी आरोग्य साधने उपलब्ध करून देण्यात आली.

ज्या सभासदांच्या विवाहाला पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत अशा दांपत्यांना सन्मानपत्र, शाल, श्रीफळ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. वार्षिक अंकासाठी सहकार्य करणाऱ्या व्यक्तींचा तसेच संघातील गटप्रमुखांचा सत्कार करण्यात आला. वर्धापनदिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. उषा गर्भे, रत्नप्रभा खोत, मंगला दळवी, अलका इनामदार, मंदाकिनी दीक्षित, नीलिमा कांबळे, भिवाजी गावडे, सतीश कुलकर्णी, गोपाळ भसे, सूर्यकांत पारखी, चंद्रकांत पारखी, नारायण दिवेकर, सुदाम गुरव, शामकांत खटावकर, दिलीप तांबोळकर, सुधाकर कुलकर्णी, हरिभाऊ क्षीरसागर, शहाजी कांबळे यांनी संयोजनात परिश्रम घेतले. राजाराम गावडे यांनी सूत्रसंचालन केले. अरविंद जोशी यांनी आभार मानले.

# १४ वर्षांच्या मुलांनाही कडक शिक्षा करण्यासाठी प्रयत्न करणार-अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : अल्पवयीन मुलांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असल्याने अल्पवयीन गुन्हेगारीची वयोमर्यादा १८ ऐवजी १४ वर्षे करण्याचा विचार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. या संदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली आहे, अशी माहिती देखील त्यांनी यावेळी दिली.



अजित पवार म्हणाले , बाल गुन्हेगारीची वयोमर्यादा १८ वर्षे आहे. मात्र, १३ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असून, मुले गुन्हेगारीकडे वळत आहेत. या वयोगटातील मुलांची दिशाभूल करून त्यांच्याकडून काही चुकीच्या गोष्टी करवून घेतल्या जातात. गुन्हा घडल्यानंतर ही मुले अल्पवयीन असल्यामुळे त्यांच्यावर कडक कारवाई करता येत नाही. त्यांना कारागृहात टाकता येत नाही. वयोमर्यादेमुळे त्यांना बालसुधारगृहात ठेवावे लागते. त्यामुळे ही वयोमर्यादा कमी करण्यासाठी केंद्रीय मंत्री अमित शहा यांना विनंती केली आहे. १४ वर्षांच्या मुलाचा गुन्ह्यात सहभाग असेल , तर कायद्यामध्ये बदल करून या वयोगटातील मुलांनाही कडक शिक्षा कशी होईल, यासाठी प्रयत्न केले जातील,असे त्यांनी सांगितले.

# गुंतवणुकीच्या बहाण्याने शिक्षकाला ४ लाखांचा गंडा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : गुंतवणुकीसाठी शिक्षकाकडून चार लाख रुपये घेतले. त्याने केलेल्या गुंतवणुकीवर नफा मिळाल्याचे खोट्या अभिलेखाद्वारे दाखवण्यात आले. शिक्षकाने झालेला नफा अथवा गुंतवलेली रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता त्याची फसवणूक केली. पिंपरी येथील संत तुकारामनगर येथे १० जून २०२४ ते ९ जुलै २०२४ या कालावधीत ही घटना घडली.

याप्रकरणी २७ जानेवारी २०२५ रोजी गुन्हा दाखल केला.पिंपरी येथील संत तुकारामनगरमधील ३८ वर्षीय शिक्षकाने याप्रकरणी सोमवारी (दि. २७) संत तुकाराम नगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. संशयित महिला लाईडिया शर्मा, राहुल कपूर आणि एका बँक खाते धारकाच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# मराठी भाषा संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : मराठी भाषा संवर्धनाचे कार्य करणाऱ्या पिंपरी चिंचवड शहरातील व्यक्तींचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त प्रजासत्ताक दिनी सन्मान करण्यात आला. पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळील मैदानावर हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. मराठी भाषेचे संवर्धन व्हावे, मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा, या हेतूने दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. यानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने मैत्री पुस्तकांशी, मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करणारे सांस्कृतिक कार्यक्रम, डिजिटल साहित्य संमेलन, मराठी भाषा संवर्धनासाठी उपक्रम राबविणाऱ्या व्यक्तींचा सन्मान असे विविध उपक्रम राबवण्यात आले आहेत.प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महानगरपालिकेने पिंपरी चिंचवड शहरातील सोपान खुडे, सुरेखा कटारिया, नंदकुमार मुरडे, बाळकृष्ण माडगुळकर, संदीप तापकीर, डॉ.धनंजय भिसे, संदीप राक्षे, संजय पवार, अरुण बोऱ्हाडे, देवेंद्र गावडे आदींचा यावेळीसन्मान करण्यात आला. याप्रसंगी उप आयुक्त अण्णा बोदडे, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता अनुश्री कुंभार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,दिव्यांग भवन फाऊंडेशनचे कार्यकारी अधिकारी परेश गांधी, माजी नगरसेवक मारुती भापकर आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांनी केले. तर सूत्रसंचालन विकास गायकांबळे यांनी केले.

प्रजासत्ताक दिनी गौरवमूर्तींना देण्यात आली भारतीय संविधानाची प्रत भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त तसेच मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात येत असून मराठी भाषा संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा प्रजासत्ताक दिनी सन्मान करताना त्यांना भारतीय संविधानाची प्रत देण्यात आली. याशिवाय भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी संघर्षाची माहिती देणारे जग बदलणारा बापमाणूस हे पुस्तकही यावेळी देण्यात आले.महापालिकेच्या वतीने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा केला जात आहे. नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करताना मराठी भाषेतील संवाद अधिक वाढावा तसेच सर्जनशीलतेला वाव मिळावायासाठी प्रयत्न केला जात आहे. या पंधरवड्यानिमित्त पिंपरी चिंचवड शहरातील मराठी भाषेचा प्रचार प्रसार करत मराठी भाषेच्या संवर्धनाचे काम करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव केला जात आहे.- किरण गायकवाड, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी , पिंपरीचिंचवड महानगरपालिका

# सी.ओ.ई.पी. तंत्रज्ञान विद्यापीठात दिमाखदार ड्रोन शो संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : सी.ओ.ई.पी. तंत्रज्ञान विद्यापीठाने प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला, ज्यामध्ये तंत्रज्ञानातील चमक आणि राष्ट्रीय अभिमान यांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळाला, ड्रोन शो हे मुख्य आकर्षण होते. सी.ओ.ई.पी. तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुनील भिरुड यांनी भारतीय राष्ट्रीय ध्वज फडकवला. डॉ. दयाराम सोनवणे (रजिस्ट्रार), प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी आणि इतर मान्यवरांचा समावेश होता.यंदाच्या ड्रोन शोचे मुख्य आकर्षण होते भारतीय ध्वजाला पुष्पांजली, ज्यामध्ये एका मॅन्युअली नियंत्रित ड्रोनने ध्वज फडकवल्यानंतर त्वरित ध्वजावर पुष्पांचा वर्षाव केला, जो देशप्रेम आणि अभिमान व्यक्त करणारा होता. त्यानंतर, प्रेक्षकांसाठी पुष्पवृष्टी करणारा एक हेक्साकॉप्टर ड्रोन प्रदर्शित झाला, ज्याने फूलांची रिमझिम वर्षाव केली, जो एकता आणि कृतज्ञतेचा प्रतीक होता. हा कार्यक्रम विद्यापीठाच्या एरियल रोबोट स्टडी सर्कल आणि रोबोट स्टडी सर्कलच्या विद्यार्थ्यांनी, डॉ. एस. एस. ओहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता.या ड्रोन शो साठी उपस्थितांनी एरियल रोबोट स्टडी सर्कल आणि रोबोट स्टडी सर्कलच्या विद्यार्थ्यांच्या सृजनशीलते, अचूकते आणि कल्पकतेचे कौतुक केले. हा कार्यक्रम तंत्रज्ञान, अभियांत्रिकी उत्कृष्टता आणि देशभक्तीचा एक परिपूर्ण संगम मानला गेला आणि सी.ओ.ई.पी. च्या आगामी पिढीच्या निर्मात्यांना प्रेरणा देण्याच्या वचनबद्धतेचे एक उत्तम उदाहरण ठरला.

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ ही एकच अशी संस्था आहे ज्या ठिकाणी Robotics & AI यामध्ये पदवी (BTech) आणि पदव्युत्तर (MTech)अभ्यासक्रम अतिशय उत्कृष्टपणे चालविण्यात येतो. रोबोटिक्स क्लबच्या या विद्यार्थ्यांनी अनेक संशोधन निबंध लिहिले आहेत, पेटंट्स मिळविली आहेत. त्याचप्रमाणे विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

# बलात्कार आणि हत्या करण्यासाठी विद्यार्थ्याने दिली १०० रुपयांची सुपारी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील एका नामांकित शाळेतील इयत्ता ७ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीवर तिच्याच वर्गातील मुलाने दुसऱ्या वर्गातील मुलाला तिच्यावर बलात्कार आणि खून करण्यासाठी १०० रुपयांची सुपारी दिल्याचा प्रकार घडला आहे. प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापकासह दोन शिक्षकांवर दौंड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दौंड येथील एका नामांकित शाळेतील एका विद्यार्थ्याने प्रगतीपुस्तकावर पालकांची खोटी सही केली. हा प्रकार त्याच्याच वर्गातील मुलीने पाहिला. या प्रकाराबाबत पीडित मुलीने शिक्षकांना सांगितले. शिक्षकांकडे तक्रार केल्याचा




राग मनात धरून त्या मुलाने दुसऱ्या वर्गातील मुलाला तक्रार करणाऱ्या मुलीवर बलात्कार कर आणि त्यानंतर तिचा खून करायचा, या कामासाठी तुला १०० रुपये देत असल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर त्या मुलाने त्याला बलात्कार आणि खून करण्यासाठी १०० रुपयांची सुपारी दिल्याचे त्याने पीडित मुलीस जाऊन सांगितले. त्यानंतर पीडित मुलीने शाळेतून घरी गेल्यावर कुटुंबियांना हा प्रकार सांगितला. त्यावर शाळेतील शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्याकडे संबधित मुलाबाबत तक्रार देण्यास कुटुंबीय गेले. पण उलट पीडित मुलीवर त्यांनी वेगवेगळे आरोप करून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. या घडामोडीनंतर पीडित मुलीचे आई वडील आमच्याकडे तक्रार देण्यास आल्यावर संबधित शाळेच्या मुख्याध्यापकासह दोन शिक्षकांवर गुन्हा दाखल केला असून त्यांच्याकडे चौकशी सुरू आहे. तर या प्रकरणातील मुलास बाल न्याय मंडळासमोर लवकरच हजर केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# प्रवासी महिलेचा विनयभंग करणारा रिक्षाचालक अटकेत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : प्रवासी महिलेचा विनयभंग करुन पसार झालेल्या रिक्षाचालकाला हडपसर पोलिसांनी अटक केली. शिवशंकर वैजनाथ परळीकर (वय २१, रा. श्रमिक वसाहत, कर्वेनगर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एका महिलेने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.तक्रारदार महिला २४ जानेवारी रोजी हडपसर गाडीतळ परिसरातून रिक्षाने मांजरीकडे निघाली होती. सिरम कंपनीजवळ असलेल्या रस्त्यावर रिक्षाचालक परळीकरने रिक्षा थांबविली आणि महिलेशी अश्लील कृत्य करण्याचा प्रयत्न केला. महिलेने आरडाओरडा केल्यानंतर तो पसार झाला. या घटनेची माहिती मिळताच हडपसर पोलिसांनी तपास सुरू केला. हडपसर गाडीतळ ते मांजरी भागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण पोलिसांनी तपासले. चित्रीकरणावरुन पसार झालेला रिक्षाचालक परळीकर याचा माग काढून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक आयुक्त अनुराधा उदमले यांच्या मार्गदर्शनाखाली हडपसर पोलीस ठाण्योच वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले, गुन्हे शाखेचे निरीक्षक नीलेश जगदाळे, अमर काळंगे, सहायक निरीक्षक अर्जुन कुदळे, संदीप राठोड, समीर पांडुळे, अभिजित राऊत यांनी ही कामगिरी केली.

# डेटिंग ॲप'वरील ओळखीतून व्यावसायिकाला लुटणारा अटकेत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

डेटिंग ॲपवर झालेली ओळख व्यावसायिकाला महागात पडली. व्यावसायिकाला धायरी भागातील निर्जन ठिकाणी बोलावून शस्त्राच्या धाकाने लुटण्यात आले. नांदेड सिटी पोलिसांनी याप्रकरणाचा तपास करुन एका तरुणासह अल्पवयीन साथीदारांना पकडले. याप्रकरणी भारत किसन धिंडले (वय १८, रा. धायरी) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याबरोबर असलेल्या तीन अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेण्यात आले. याबाबत एका व्यावसायिकाने फिर्याद दिली होती. ही घटना १४ जानेवारी रोजी रात्री आठच्या सुमारास धायरीतील डीएसके विश्व परिसरातील एका शाळेजवळ घडली होती.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी व्यावसायिक आणि आरोपीची एका डेटिंग ॲपवरुन ओळख झाली होती. आरोपी धिंडलेने व्यावसायिकाशी ओळख वाढवून त्याला १४ जानेवारी रोजी धायरीतील डीएसके विश्व रस्त्यावर बोलाविले होते. व्यावसायिक तेथे गेला. त्याला धिंडले आणि त्याच्याबरोबर तीन अल्पवयीन साथीदारांनी शस्त्राचा धाक दाखविला. त्याच्याकडील सोन्याची बाळी, मोबाइल संच आणि रोकड असा मुद्देमाल लुटून चौघे जण पसार झाले.

या घटनेनंतर घाबरलेल्या व्यावसायिकाने नांदेड सिटी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

# बनावट गुणपत्रिकेद्वारे टपाल खात्यात नोकरी मिळवण्याचा प्रयत्न ; गुन्हा दाखल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

दहावी उत्तीर्ण झाल्याची बनावट गुणपत्रिका सादर करुन टपाल खात्याची फसवणूक केल्याप्रकरणी फरासखाना पोलिसांनी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

याप्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेला २२ वर्षीय तरुण मूळचा अहिल्यानगरमधील पारनेर तालुक्यातील आहे. याबाबत सचिन कामठे (वय ३८, रा. सागर पार्क, वडगाव शेरी) यांनी फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टपाल खात्याकडून डाकसेवक पदासाठी भरती प्रक्रिया राबविली होती. ग्रामीण डाक सेवक ऑनलाइन भरती महाराष्ट्र सर्कल २०२३ (सायकल ५) परीक्षेत मुळे याने दहावी उत्तीर्ण असल्याबाबतचे बनावट प्रमाणपत्र सादर केले. बनावट प्रमाणाद्वारे त्याने नोकरी मिळवण्याचा प्रयत्न केला. शहर टपाल कार्यालयातील (सिटी पोस्ट) अधिकारी सचिन कामठे यांनी गुणपत्रिकेची पडताळणी केली. तेव्हा गुणपत्रिका बनावट असल्याचे उघडकीस आले. त्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक संतोष गोरे तपास करत आहेत.